महाराष्ट्र पोलीस

# पोलीस उप आयुक्त वाहतुक विभाग, ठाणे शहर

तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)

दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६

Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव


जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ ८०३ /२०२२ दि. २६/०८/२०२२

## "वाहतुक नियंत्रण अधिसुचना"

**ज्याअर्थी**, ठाणे शहरात नौपाडा वाहतुक उप विभागाचे कार्यक्षेत्रात दि. ३१/०८/२०२२ ते ०९/०९/२०२२ या कालावधीत गणेशोत्सव हा सण साजरा होणार असून गणेशमुर्ती विसर्जनाचे दिवशी म्हणजे दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन), दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत गणेश मुर्ती विसर्जन मिरवणूकांचे मार्गावर व परिसरातील वाहतूक सुनिश्चित होण्यासाठी आम जनतेच्या सोईसाठी,

**त्याअर्थी**, मी दत्तात्रय कांबळे, पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१ अतिरिक्त कार्यभार पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसुचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१) (अ) (ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसुचना जारी करीत आहे

**प्रवेश बंद–** १) विष्णुनगर नौपाडा, सोपान चौक, राम मारूती रोड, मासुंदा तलाव मार्गे ठाणे स्टेशनकडे जाण्यास सर्व उपरस्त्यांवर सर्व प्रकारच्या वाहनांना नमस्कार हॉटेल क्रास येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सरदची वाहने राम मारूती रोडने–स्विट कॉर्न–गांवदेवी बस स्टॉप वरून पुढे शिवाजी पथवर उजवीकडे आंबेडकर चौक मार्गे ठाणे स्टेशनकडे जातील.

**प्रवेश बंद–** २) ठाणे स्टेशन येथुन गांवदेवी मार्गे शिवाजी पथने मिनाताई ठाकरे चौक व कळवा बाजुकडे जाण्यास सर्व प्रकारच्या वाहनांना गांवदेवी क्रॉस येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची वाहने ठाणे स्टेशन येथुन गोखले रोडने कल्पना केंद्र–म. फुले मार्गे–घंटाळी चौक–तीन पेट्रोल पंप–पुढे एल.बी. एस. मार्गाने सरळ मिनाताई ठाकरे चौक किंवा ठाणे स्टेशन येथुन आंबेडकर चौक–अशोक सिनेमा–एस. टी. आउट गेट–चेंदनी कोळीवाडा–सिडको रोड मार्गे कळवा बाजुकडे इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ३) चरई भागातुन व वीर सावरकर रोडने गडकरी सर्कलकडे येण्यास सर्व वाहनांना हॉटेल कोल्हापुर येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** सदरची हलकी वाहने सावरकर रोड टिळक चौक येथुन पुढे जावुन भवानी चौकातुन कोर्टनाका येथुन उजवीकडे वळुन इच्छित स्थळी जातील.

**प्रवेश बंद–** ४) हरीनिवास नाक्याकडुन येणारी वाहने तीन पेट्रोल पंपावरून सरळ गजानन चौकाकडे जाण्यास **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग–** गणेश विसर्जन दिवशी, सार्वजनिक व खाजगी गणपती हे तीन पेट्रोल पंप येथून सरळ गजानन चौकाकडे न जाता डावीकडे वळण घेवून वंदना टी पॉईट येथुन उजवीकडे गजानन चौकातुन राम मारूती रोडने गाडगीळ चौकातील **"बबल्स दुकानाकडुन"** डावीकडे वळुन मासुंदा तलाव येथे विसर्जनासाठी जातील.

**नो पार्किंग–** ५) डॉ. मुस रोड ते गडकरी सर्कल ते टॉवर नाका ते मुस चौक या रोडवर (तलावपाळी परीसर) गणपती विसर्जनासाठी गणेशमुर्ती घेवुन आलेली वाहने मुर्ती उतरविल्यावर सदर ठिकाणी वाहने उभी करण्यास मनाई करण्यात येत आहे.

**पार्किंग मुभा–** ६) नौका विहार तलावपाळी, दत्त मंदिर समोरील घाट व जीवन पांगे घाट (टॉवर नाका) येथे गणपती विसर्जनासाठी आलेली वाहने ही मुर्ती उतरविल्यावर ताबडतोब हायवे सर्व्हिस रोड येथे पार्किंग करतील.

सदरची वाहतूक अधिसचुना ही दि. ०१/०९/२०२२ (दिड दिवसांचे), दि. ०४/०९/२०२२ (गौरी गणपती विसर्जन), दि. ०६/०९/२०२२ (सात दिवसांचे) दि. ०९/०९/२०२२ (अनंत चर्तुदशी) या कालावधीत दुपारी १२.०० वा. पासून गणेश मुर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहिल. सदरची वाहतुक अधिसुचना ही पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मुर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

( दत्तात्रय कांबळे )
पोलीस उप आयुक्त, मुख्यालय ०१, ठाणे शहर
अतिरिक्त कार्यभार
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

CS CamScanner

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**<u>प्रत माहितीसाठी सादर :–</u>**

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर.
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर.
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर.
मा. जिल्हाधिकारी, ठाणे.
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–१, ठाणे, परिमंडळ–५ वागळे इस्टेट व विशेष शाखा, ठाणे.

**<u>प्रत कार्यवाहीसाठी :–</u>**
प्रादेशिक परिवहन अधिकारी ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे महानगरपालिका, ठाणे, बृहन्मंबई व वसई–विरार महानगरपालिका.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे.
विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे.

प्रतः– <u>पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर</u>
२/– सदरची अधिसुचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– <u>समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे</u>
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– <u>सपोआ वाहतूक विभाग, ठाणे व सर्व संबंधीत प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग.</u>
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.

CamScanner